LAR No. 120-2023
Bhagirathibai Vs. State
CNR NO. MHOS140002422023

## अर्ज क्र. ०८, १० व १६ वर संयुक्तीकरित्या आदेश पारीत

प्रस्तुतचे प्रकरण भुसंपादन कायद्यांतर्गत वाढीव मावेजा मिळण्यासाठी दाखल आहे. यातील मुळ अर्जदार भागिरथीबाई यांचा मृत्यू दिनांक १५.०६.२०१५ रोजी झालेला आहे. त्यांना निशाणी क्रमांक ८ मध्ये नमुद असलेले वारस आहेत. या वारसांना रेकॉर्डवर आणण्यासाठी ऊशीर झालेला आहे. तो ऊशीर माफ होऊन मिळण्यासाठी निशाणी क्रमांक १० वर ऊशीर माफीचा अर्ज, निशाणी क्रमांक ८ वर अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज तर निशाणी क्रमांक १६ वर वारसांना रेकॉर्डवर आणण्याचा अर्ज आहे. निशाणी क्रमांक १५ वर मुळ अर्जदाराच्या मृत्यूचा दाखल आहे. वरील अर्जावर गैरअर्जदारातर्फे म्हणणे दाखल नाही.

२. भुसंपादन कायदा हा beneficiary legislation आहे. ज्याचा मुख्य उद्देश हा ज्या गोर–गरिबांच्या जमिनी संपादित केल्या आहेत त्यांना योग्य तो मावेजा मिळावा हा आहे. भागिरथीबाई या मयत आहेत. त्यांचे वारस जिवंत आहेत. त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर आणल्यास गैरअर्जदाराचे काही नुकसान होणार नाही. अज्ञानामुळे वारसांना रेकॉर्डवर आणण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे तो न्याय होण्याच्या दृष्टीकोनातून माफ होणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश.

## आदेश

१. निशाणी क्रमांक ०८ वरील अबेटमेंट सेट असाईड करण्याचा अर्ज मंजुर
२. निशाणी क्रमांक १० वरील विलंब माफीचा अर्ज मंजुर
३. निशाणी क्रमांक १६ वरील वारस रेकॉर्डवर आणण्याचा अर्ज मंजुर

४. निशाणी क्रमांक १६ मध्ये नमुद असलेले वारस क्रमांक १ ते ५ पैकी वारस क्रमांक १ व २ यांची नावे अर्जदाराच्या यादीत टाकावीत तर वारस क्रमांक ३ ते ५ यांची नावे ते वारस म्हणून रेकॉर्डवर येण्यास तयार नसल्यामुळे गैरअर्जदार क्रमांक ४ ते ६ यांच्या वर्गात टाकावीत.

RAJU TUKARAM INGLE

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2024.10.01 12:19:17 +0530

दिनांक – ३०.०९.२०२४

**(आर. टी. इंगळे)**

दिवाणी न्यायाधीश व.स्तर,परंडा.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | Vaibhav Mohanrao Ingale<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 30-09-2024 |
| Order signed by the presiding officer on | - | 30-09-2024 |
| Order uploaded on | - | 01-09-2024 |